नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११३ Issue - 113 | वार - गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६ Blow- Thursday Date 17 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ईपीएफओचा मोठा निर्णय! वेतन मर्यादा ₹१५ हजारांवरून ₹२५ हजार होणार

## ५१ लाख कर्मचाऱ्यांना होणार फायदा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कर्मचारी वर्गासाठी महत्त्वाचा निर्णय घेत केंद्र सरकारने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना अंतर्गत अनिवार्य समावेशासाठीची मासिक वेतनमर्यादा ₹१५ हजारांवरून ₹२५ हजार करण्यास मंजुरी दिल्याची माहिति समोर आली आहे. हा बदल लागू झाल्यास सध्या ₹१५ हजार ते ₹२५ हजार मासिक वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांना एझ्रऋजच्या सामाजिक सुरक्षा व्यवस्थेच्या कक्षेत येण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. सरकारच्या अंदाजानुसार, या निर्णयामुळे ५१ लाखांहून अधिक अतिरिक्त कर्मचारी एझ्रऋजच्या कक्षेत येऊ शकतात.

सध्या ईपीएफ योजनेअंतर्गत अनिवार्य कव्हरेजसाठी वेतनमर्यादा ₹१५ हजार आहे. ही मर्यादा १ सप्टेंबर २०१४ पासून लागू आहे. त्यानंतर वेतनपातळी आणि रोजगाराच्या स्वरूपात झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर सामाजिक सुरक्षेचा विस्तार करण्यासाठी मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

नवीन मर्यादा लागू झाल्यास ₹१५ हजार ते ₹२५ हजार मासिक वेतन असलेल्या पात्र कर्मचाऱ्यांचा ईपीएफओच्या सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये समावेश होऊ शकतो. यामुळे एझ्रऋ बचत, कर्मचारी पेन्शन योजना आणि कर्मचारी ठेव-संलग्न विमा योजना यांसारख्या सुविधांचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. ईपीएफओ व्यवस्थेत कर्मचारी आणि नियोक्त्याकडून योगदान दिले जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांसाठी दीर्घकालीन बचत तसेच निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने या योजनेला महत्त्व आहे.

वेतनमर्यादा वाढवण्याचा निर्णय लागू करण्यासाठी आवश्यक नियम, अधिसूचना आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणीची तारीख आणि पात्रतेचे अंतिम निकष केंद्र सरकार व ईपीएफओकडून स्पष्ट झाल्यानंतरच निश्चित होतील.

मर्यादा ₹२५ हजार झाल्यास सध्या एझ्रऋजच्या अनिवार्य कक्षेबाहेर असलेल्या मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना औपचारिक सामाजिक सुरक्षा व्यवस्थेत सामील होण्याची संधी मिळू शकते.

# आटगांव येथे भीषण दुर्घटना, एकाच कुटुंबातील चौघांचा करुण अंत, सात जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे : मुंबई-नाशिक महामार्गावर आटगांव इथे भीषण अपघाताची घटना घडली आहे. या घटनेत एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाला आहे. तसेच ७ जण जखमी झाले आहेत. हे सातही जणदेखील एकाच कुटुंबातील आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या अपघाताच्या घटनेवर हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे अपघातग्रस्त कुटुंबिय हे देवदर्शन करुन मुंबईच्या दिशेला परतत होतं. हे कुटुंब मुंबईच्या जोगेश्वरी येथे वास्तव्यास होतं. या अपघाताच्या घटनेत अवघ्या १ वर्षीय आणि ८ वर्षीय चिमुकल्यांचा देखील मृत्यू झाल्याने दु:ख व्यक्त केले जात आहे. रस्त्यापासून काही फुटावर बंद पडलेल्या ट्रेलरला मागून कारने दिलेल्या धडकेत कारमधील चौघांचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर तालुक्यातील आटगांव येथे घडली. तर, या अपघातात सात जण जखमी झाले आहेत. यातील तिघे गंभीर जखमी असल्याची माहिती शहापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नागरगोजे यांनी दिली. मृत आणि जखमी एकाच कुटुंबातील असून हे कुटुंब त्र्यंबकेश्वर येथून दर्शन घेऊन मुंबईला परतत असताना हा भीषण अपघात घडल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईतील जोगेश्वरी येथे राहणारे जयस्वाल कुटुंब मंगळवारी रात्री साडेबारा वाजता जोगेश्वरी येथून कारने त्र्यंबकेश्वरला जाण्यासाठी निघाले. त्र्यंबकेश्वरला पाहोचल्यानंतर सकाळी ९ वाजता या कुटुंबाने दर्शन घेतले. नंतर पुन्हा हे कुटुंब कारने मुंबईला जाण्यासाठी निघाले. कारमधून एकूण ११ जण प्रवास करीत होते. वाटेत त्यांनी जेवण केले. कार मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर तालुक्यातील आटगांव येथे आल्यानंतर या कारने रस्त्यापासून दहा ते १५ फूट अंतरावर बंदावस्थेत उभ्या असलेल्या ट्रेलरला मागून धडक दिली. या भीषण अपघातांमध्ये कारमधील चौघांचा मृत्यू झाला असून मृतांची वय ८, १, २८, ३५ वर्ष असल्याची माहिती शहापूर पोलिसांनी दिली. तर, तीनजण गंभीर जखमी असून त्यांच्यावर ठाण्यातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अन्य चार जखमींवर शहापूर तालुक्यातील रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कारचे स्टेअरिंग जाम झाल्याने ही कार अनियंत्रित होऊन हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज शहापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल नागरगोजे यांनी व्यक्त केला आहे. या अपघाताची सविस्तर चौकशी करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

# राज्यातील नद्यांच्या संवर्धनासाठी नदी संवर्धन अभियान राबविण्यात येणार : जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नद्यांचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी 'महाराष्ट्र नदी संवर्धन अभियान' राबविण्यात येईल. अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नाशिक येथे आयोजित संमेलनातून लवकरच करण्यात येणार आहे. या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार असून आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक येथे विशेष राज्यस्तरीय कार्यशाळा तसेच कार्यक्रमांचे आयोजनही केले जाणार आहे.

मंत्रालयात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली नदी पुनरुज्जीवनबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस डॉ. राजेंद्र सिंह, सचिव एकनाथ डवले, डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, सचिव (लाभक्षेत्र विकास) प्रकाश मिसाळ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि जल बिरादरीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्य शासनाने 'चला जाणूया नदीला' हे अभियान राबविले होते. या अभियानांतर्गत राज्यातील ३५ जिल्ह्यांमधील १०८ नद्यांचा अभ्यास करण्यात आला. नद्यांविषयी जनजागृती करण्यासह त्या अविरल, निर्मळ आणि प्रवाही करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचाही अभ्यास करण्यात आला आहे. स्थानिक नागरिक, विद्यार्थी, पारंपरिक ज्ञान असलेले अभ्यासक, शास्त्रज्ञ आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या सहभागातून लोकअभ्यास व कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत. या आराखड्यांमध्ये सुचविलेल्या उपाययोजनांच्या आधारे जलसंपदा विभाग आणि राज्य शासनाचे अन्य संबंधित विभाग समन्वयाने नदी संवर्धनाचे काम करणार आहेत. जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांनी यावेळी महाराष्ट्रातील नद्यांचे पुनरुज्जीवन आणि संवर्धन हा महत्त्वाचा विषय आहे. या पार्श्वभूमीवर विविध पातळीवर शासनाच्या प्रयत्नांबाबत समाधान व्यक्त केले. महाराष्ट्रात नद्यांना पुनरुज्जीवित करण्यासाठी या प्रयत्नांचा भाग म्हणून नाशिक येथे होणारा कार्यक्रम महत्त्वाचा ठरेल असे ते म्हणाले. बैठकीस जल बिरादरीचे नरेंद्र चुघ, डॉ. सुमंत पांडे, अभिनेते चिन्मय उदगीरकर, महेंद्र महाजन, राजेश पंडित, मनोज साठे आदी प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमाचा अभ्यास करून आंध्र प्रदेशातही अशा प्रकारचा कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने जल बिरादरीचे राष्ट्रीय समन्वयक सत्यनारायण बोलशेट्टी यांनी बैठकीत सहभाग घेतला.



# ११ रुपयांच्या सलाईन नळीची ३२५ रुपयांना विक्री, आयुक्त तुकाराम मुंढे यांचे केंद्राला पत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रुग्णालयांमध्ये उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या वैद्यकीय साहित्याच्या किमती आणि त्यावर छापलेल्या कमाल किरकोळ किमतीतील (एमआरपी) तफावत पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. रुग्णालयाला अवघ्या ११.०५ रुपयांना मिळणाऱ्या आयव्ही इन्फ्युजन सेटची (सलाईन नळी) किंमत तब्बल ३२५ रुपये असल्याचे महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाच्या पाहणीत समोर आले आहे. या खरेदी दर आणि एमआरपीतील तब्बल २ हजार ८४१ टक्के फरकावर प्रश्न उपस्थित करत अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केंद्र सरकारला पत्र पाठवून वैद्यकीय साहित्याच्या किमतीतील अशा तफावतीवर नियमन करण्याची शिफारस केली आहे.

वैद्यकीय उपचारांचा खर्च ठरविताना औषधांच्या किमतींबाबत काही प्रमाणात नियमनाची व्यवस्था आहे. मात्र, रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या वैद्यकीय उपकरणे आणि उपभोग्य साहित्याच्या बाबतीत खरेदी किंमत आणि छापील एमआरपी यांच्यातील फरकाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. मुंढे यांनी याच मुद्द्याकडे केंद्राचे लक्ष वेधले आहे.



महाराष्ट्रात करण्यात आलेल्या पाहणीत आयव्ही इन्फ्युजन सेटव्यतिरिक्त सिरिंज आणि कॅथेटरच्या किमतीतही मोठी तफावत आढळली. ६.७५ रुपयांना खरेदी केलेल्या सिरिंजची एमआरपी ५७.२० रुपये, तर २९.४१ रुपयांना खरेदी केलेल्या कॅथेटरची एमआरपी ३१० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ऑक्सिजन मास्क, नेब्युलायझर यांसारख्या वैद्यकीय साहित्याच्या किमतींमध्येही लक्षणीय फरक असल्याचे पाहणीत आढळले आहे. रुग्णालयात उपचार घेत असताना कोणत्या कंपनीचे किंवा कोणत्या किमतीचे साहित्य वापरले जात आहे, याची तुलना करण्याची संधी रुग्णाला अनेकदा मिळत नाही. पॅकेटवर छापलेली एमआरपी हीच त्या साहित्याची प्रत्यक्ष किंमत असल्याचे रुग्णाला वाटू शकते. त्यामुळे उत्पादक किंवा वितरकाकडून रुग्णालयाला वस्तू किती किमतीला मिळते आणि रुग्णाकडून त्यासाठी किती रक्कम आकारली जाते, यातील फरक पारदर्शकपणे समोर येणे आवश्यक असल्याचा मुद्दा मुंढे यांनी मांडला आहे. औषधांच्या किमतींवर 'ड्रग्ज (प्राइस कंट्रोल) ऑर्डर, २०१३' अंतर्गत नियंत्रणाची व्यवस्था आहे. मात्र, बहुतांश वैद्यकीय उपकरणे आणि उपभोग्य साहित्य या कक्षेत येत नसल्याने त्यांच्या किमतीतील तफावतीवर अधिक स्पष्ट नियमनाची गरज असल्याचे मुंढे यांनी केंद्राला पाठविलेल्या पत्रातून सूचित केले आहे. 'ट्रेड प्राइज' आणि घोषित एमआरपी यांच्यात किती फरक असावा, याबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत, अशी शिफारस त्यांनी औषध विभाग आणि राष्ट्रीय औषध किंमत निर्धारण प्राधिकरणाकडे (एनपीपीए) केली आहे.

स्टार्टअप आणि इनोव्हेशनला चालना; एआय, सायबर सुरक्षा आणि डीप-टेकवर भर

# नवोन्मेषाच्या बळावर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राला नवोन्मेषाधारित अर्थव्यवस्थेचे केंद्र बनवत १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने निश्चित केले आहे. सिंगापूरमध्ये १५ आणि १६ सप्टेंबर रोजी झालेल्या 'टेक इन एशिया कॉन्फरन्स २०२६'मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदेशातून महाराष्ट्राचे स्टार्टअप, इनोव्हेशन आणि प्रगत तंत्रज्ञानाविषयीचे धोरण जागतिक समुदायासमोर मांडण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे महाराष्ट्राच्या विकासाचा दृष्टिकोन मांडताना नवोन्मेष, इनक्युबेशन आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्यापक आर्थिक परिणाम साधण्यावर भर दिला. स्टार्टअप्स, संशोधन संस्था, उद्योग, शैक्षणिक संस्था, गुंतवणूकदार आणि युवा नवोन्मेषक यांना एका सक्षम परिसंस्थेत जोडून महाराष्ट्राला राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावरील इनोव्हेशन हब बनवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

या परिषदेत आशियातील तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योजक, गुंतवणूकदार आणि तज्ज्ञ सहभागी झाले. यंदाच्या परिषदेत एंटरप्राइज एआय आणि त्याचा प्रत्यक्ष व्यवसायांमध्ये वापर हा प्रमुख विषय होता.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी परिषदेत उद्घाटनपर भाषण केले. त्यांनी महाराष्ट्रातील स्टार्टअप परिसंस्था, युवा नवउद्योजकांसाठीच्या योजना, इनक्युबेशन सुविधा, डीप-टेक क्षेत्रातील संधी आणि राज्यातील स्टार्टअप्सना जागतिक बाजारपेठेशी जोडण्याच्या धोरणाची माहिती दिली.



कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, डीपफेक प्रतिबंधक तंत्रज्ञान, फिनटेक, क्लीनटेक आणि रोबोटिक्स यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राचे स्थान मजबूत करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र-सिंगापूर सहकार्याच्या संधी स्टार्टअप्स, नवोन्मेष, प्रगत तंत्रज्ञान, इनक्युबेशन, गुंतवणूक, संशोधन आणि जागतिक बाजारपेठेशी जोडणी या क्षेत्रांत महाराष्ट्र आणि सिंगापूरदरम्यान सहकार्याच्या संधी असल्याचेही डॉ. पाटील यांनी सांगितले.

नवोन्मेषाला चालना देण्यासाठी आशियातील विविध देशांनी परस्पर सहकार्य वाढवावे आणि इनक्युबेशन परिसंस्था अधिक मजबूत करावी, असे आवाहन परिषदेत करण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील स्टार्टअप्सना आंतरराष्ट्रीय नेटवर्क, तंत्रज्ञान आणि बाजारपेठांशी जोडण्याच्या दृष्टीने या व्यासपीठाचे महत्त्व अधोरेखित झाले.

# सुसाट वेगात चुकीच्या दिशेने वळण; पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाची भारतीय युद्धनौकेला धडक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली: उत्तर अरबी समुद्रात एक गंभीर घटना घडली. पाकिस्तानी नौदलाचं एक जहाज भारतीय नौदलाच्या एका युद्धनौकेजवळ आलं. भारतीय जहाजाकडून नियमित टेहळणी सुरू होती. तेव्हा पाकिस्तानी नौदलाचं जहाज अतिशय वेगानं आणि असुरक्षित पद्धतीनं भारतीय युद्धनौकेजवळ आलं. पाकिस्तानी नौदलाच्या जहाजानं चुकीच्या दिशेनं दिशा बदलली. त्यामुळे दोन्ही जहाजांची धडक झाली. सुदैवानं यामध्ये कोणतंही मोठं नुकसान झालेलं नाही.

आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात ही घटना घडली. भारतानं याची गंभीर दखल घेतली आहे. घटना घडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १६ सप्टेंबरला पाकिस्तानी उच्चायुक्तालयाच्या चार्ज ऑफ द अफेअर्सला भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं समन्स बजावून बोलावून घेतलं. त्यांच्याकडे घटनेचा निषेध नोंदवण्यात आला. काल घडलेला प्रकार हा दोन्ही देशांमध्ये एप्रिल १९९१ मध्ये झालेल्या कराराचं उल्लंघन असल्याचं भारतानं म्हटलं आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात सैन्य सराव, सैनिकांची वाहतूक याबद्दलची माहिती एकमेकांना आधीच देण्याचा करार १९९१ मध्ये झाला होता. त्यातील कलम १० मध्ये नियमांचं पालन करण्याचा उल्लेख आहे. पाकिस्तानी जहाजाकडून घडलेला प्रकार या नियमाच्या विरोधात जाणारा आहे. या संदेश संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवा, असा सल्ला भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं पाकिस्तानच्या चार्ज ऑफ द अफेअर्सला दिला.

सगळ्या सैन्य तुकड्यांनी सावध आणि सतर्क राहायला हवं. दोन्ही बाजूंनी (पान २ वर...)

## संपादकीय....

### मुंढेंचा पवित्रा

रुग्णालयांमध्ये उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या वैद्यकीय साहित्याच्या किमती आणि त्यावर छापलेल्या कमाल किरकोळ किमतीतील (एमआरपी) तफावत पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. रुग्णालयाला अवघ्या ११.०५ रुपयांना मिळणाऱ्या आयव्ही इन्फ्युजन सेटची (सलाईन नळी) किंमत तब्बल ३२५ रुपये असल्याचे महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाच्या पाहणीत समोर आले आहे. या खरेदी दर आणि एमआरपीतील तब्बल २ हजार ८४१ टक्के फरकावर प्रश्न उपस्थित करत अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केंद्र सरकारला पत्र पाठवून वैद्यकीय साहित्याच्या किमतीतील अशा तफावतीवर नियमन करण्याची शिफारस केली आहे. वैद्यकीय उपचारांचा खर्च ठरविताना औषधांच्या किमतींबाबत काही प्रमाणात नियमनाची व्यवस्था आहे. मात्र, रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या वैद्यकीय उपकरणे आणि उपभोग्य साहित्याच्या बाबतीत खरेदी किंमत आणि छापील एमआरपी यांच्यातील फरकाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. मुंढे यांनी याच मुद्द्याकडे केंद्राचे लक्ष वेधले आहे. महाराष्ट्रात करण्यात आलेल्या पाहणीत आयव्ही इन्फ्युजन सेटव्यतिरिक्त सिरिंज आणि कॅथेटरच्या किमतीतही मोठी तफावत आढळली. ६.७५ रुपयांना खरेदी केलेल्या सिरिंजची एमआरपी ५७.२० रुपये, तर २९.४१ रुपयांना खरेदी केलेल्या कॅथेटरची एमआरपी ३१० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ऑक्सिजन मास्क, नेब्युलायझर यांसारख्या वैद्यकीय साहित्याच्या किमतींमध्येही लक्षणीय फरक असल्याचे पाहणीत आढळले आहे. रुग्णालयात उपचार घेत असताना कोणत्या कंपनीचे किंवा कोणत्या किमतीचे साहित्य वापरले जात आहे, याची तुलना करण्याची संधी रुग्णाला अनेकदा मिळत नाही. पॅकेटवर छापलेली एमआरपी हीच त्या साहित्याची प्रत्यक्ष किंमत असल्याचे रुग्णाला वाटू शकते. त्यामुळे उत्पादक किंवा वितरकाकडून रुग्णालयाला वस्तू किती किमतीला मिळते आणि रुग्णाकडून त्यासाठी किती रक्कम आकारली जाते, यातील फरक पारदर्शकपणे समोर येणे आवश्यक असल्याचा मुद्दा मुंढे यांनी मांडला आहे.

# समान काम, समान वेतन : अधिकार, न्याय आणि व्यवहार्यतेचा प्रश्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

'समान काम, समान वेतन' हा शब्दप्रयोग ऐकायला साधा असला तरी त्यामागे भारतीय समाजव्यवस्थेतील समानता, सामाजिक न्याय आणि कामगारांच्या प्रतिष्ठेचा मोठा प्रश्न दडलेला आहे. एखाद्या संस्थेत दोन व्यक्ती जवळपास समान स्वरूपाचे काम करतात, समान प्रकारची जबाबदारी पार पाडतात आणि त्यांच्याकडून समान पात्रता व कौशल्याची अपेक्षा केली जाते; मात्र त्यापैकी एका व्यक्तीला अधिक आणि दुसऱ्याला कमी वेतन मिळते, तर या फरकाचे कारण काय, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. वेतनातील प्रत्येक फरक अन्यायकारक असतो असे नाही; परंतु प्रत्येक फरकाला न्याय्य आणि वस्तुनिष्ठ आधार असणे आवश्यक आहे. याच ठिकाणी 'समान काम, समान वेतन' या तत्त्वाची खरी चर्चा सुरू होते.

भारतीय संविधानाने समानतेला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांमध्ये स्त्री आणि पुरुषांना समान कामासाठी समान वेतन मिळावे, अशी स्पष्ट दिशा देण्यात आली आहे. त्यामुळे समान कामासाठी समान मोबदला हा केवळ कर्मचारी संघटनांचा घोष नाही; तो सामाजिक न्यायाच्या व्यापक संकल्पनेशी जोडलेला विषय आहे. मात्र या तत्त्वाचा अर्थ प्रत्येक व्यक्तीला समान वेतन देणे असा होत नाही. समान काम करणाऱ्यांमध्ये समानता आणि भिन्न स्वरूपाचे काम करणाऱ्यांमध्ये योग्य भेद हे दोन्ही एकाच वेळी मान्य करावे लागतात.

म्हणूनच या विषयातील पहिला आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे- 'समान काम' म्हणजे नेमके काय? केवळ पदाचे नाव समान आहे म्हणून काम समान ठरत नाही. कामाचे प्रत्यक्ष स्वरूप, जबाबदारीची पातळी, आवश्यक शैक्षणिक पात्रता, कौशल्य, अनुभव, निर्णयक्षमता, कार्यभार, कामाची परिस्थिती आणि अपेक्षित परिणाम या सर्व घटकांचा विचार करावा लागतो. दोन कर्मचाऱ्यांची पदे सारखी असली तरी त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्यांमध्ये मूलभूत फरक असेल, तर वेतनातील फरकाचे वस्तुनिष्ठ कारण असू शकते. म्हणून समान वेतनाचा प्रश्न भावनिक पातळीवर न ठेवता कामाच्या वस्तुनिष्ठ तुलनेच्या आधारावर तपासला पाहिजे.

आज अनेक क्षेत्रांमध्ये कायम स्वरूपी, कंत्राटी, तात्पुरते, मानधनावर किंवा अंशकालीन कर्मचारी कार्यरत आहेत. काही ठिकाणी नियुक्तीची पद्धत वेगळी असली तरी प्रत्यक्ष कामामध्ये मोठ्या प्रमाणात साम्य दिसते. अशा वेळी केवळ 'तुम्ही कंत्राटी आहात', 'तुमची नियुक्ती तात्पुरती आहे' किंवा 'तुम्हाला मानधन दिले जाते' एवढे कारण पुरेसे आहे का, हा प्रश्न विचारला जातो. दुसरीकडे, कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांच्या सेवा-अटी, जबाबदाऱ्या आणि दीर्घकालीन संस्थात्मक बांधिलकी वेगळी असू शकते. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक ठरते.

याच संदर्भात न्यायालयीन दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. 'समान काम, समान वेतन' हे तत्त्व लागू करताना न्यायालयांनी कामाचे प्रत्यक्ष स्वरूप, जबाबदारी आणि परिस्थिती यांचा तुलनात्मक विचार करण्यावर भर दिला आहे. म्हणजेच केवळ समान पदनाम किंवा समान संस्थेत काम करणे एवढ्यावर समान वेतनाचा दावा आपोआप सिद्ध होत नाही. त्याचप्रमाणे नियुक्तीचा प्रकार वेगळा आहे म्हणून समान स्वरूपाच्या कामाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करता येणार नाही. या दोन टोकांमध्ये वस्तुनिष्ठ कसोटी शोधणे हे प्रशासन आणि न्यायव्यवस्थेसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे.

या प्रश्नाची आर्थिक बाजूही दुर्लक्षित करता येत नाही. एखाद्या संस्थेतील मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांचे वेतन समान पातळीवर आणायचे असल्यास त्याचा आर्थिक परिणाम मोठा असू शकतो. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था किंवा सार्वजनिक निधीतून चालणाऱ्या संस्थांच्या बाबतीत हा खर्च शेवटी सार्वजनिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकतो. खासगी संस्थांमध्येही वेतनवाढीचा परिणाम संस्थेच्या खर्चरचनेवर होतो. त्यामुळे समान वेतनाची मागणी मान्य करताना आर्थिक व्यवहार्यता हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. परंतु आर्थिक भाराचा प्रश्न उपस्थित झाला म्हणून समानतेच्या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही. आर्थिक क्षमता, टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी, पदरचना आणि कामाचे मूल्यमापन यांचा एकत्रित विचार करता येतो.


वेतनातील असमानतेचा परिणाम कर्मचाऱ्याच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीपुरता मर्यादित राहत नाही. कामाच्या ठिकाणी त्याचा मनोबल, संस्थेशी असलेली बांधिलकी आणि कामाबद्दलची भावना यावरही परिणाम होऊ शकतो. समान जबाबदारीचे काम करूनही एखाद्याला सातत्याने कमी मोबदला मिळत असल्याची भावना निर्माण झाली तर असंतोष वाढू शकतो. मात्र याउलट, अनुभव, विशेष कौशल्य, अतिरिक्त जबाबदारी किंवा कार्यक्षमता यांना वेगळा मोबदला देण्याची व्यवस्था असणेही आवश्यक आहे. समानतेचा अर्थ सर्व फरक नष्ट करणे नव्हे; तर अन्यायकारक आणि कारणाशिवाय असलेले फरक दूर करणे हा त्याचा गाभा आहे.

या चर्चेत सेवा-सुविधांचाही समावेश करणे गरजेचे आहे. वेतन समान असले तरी दोन कर्मचाऱ्यांच्या रजा, भविष्यनिर्वाह निधी, विमा, निवृत्तीविषयक लाभ किंवा इतर सेवा-अटींमध्ये मोठी तफावत असेल तर प्रत्यक्ष सेवा-समानतेचा प्रश्न कायम राहतो. त्यामुळे भविष्यात 'समान काम, समान वेतन' या तत्त्वाकडे पाहताना केवळ हातात मिळणाऱ्या मासिक रकमेकडे न पाहता एकूण सेवा-सुविधांचा विचार करणे आवश्यक ठरू शकते.

महिला आणि पुरुषांच्या वेतनातील समानतेचा मुद्दाही याच चौकटीत येतो. समान पात्रता आणि समान स्वरूपाचे काम करणाऱ्या व्यक्तींना केवळ लिंगाच्या आधारावर वेतनात भेदभाव होणे हा समानतेच्या मूलभूत विचाराशी विसंगत प्रश्न आहे. महिलांचा रोजगारातील सहभाग वाढवायचा असेल, आर्थिक स्वावलंबन मजबूत करायचे असेल आणि कामाच्या ठिकाणी समान संधी निर्माण करायच्या असतील तर समान कामासाठी समान मोबदला हा महत्त्वाचा घटक आहे.

मात्र या तत्त्वाची अंमलबजावणी करायची असेल तर घोषणांपेक्षा स्पष्ट यंत्रणा आवश्यक आहे. प्रत्येक पदाचे काम नेमके काय आहे, त्यासाठी कोणती पात्रता आवश्यक आहे, जबाबदारी किती आहे, कामाचा कार्यभार किती आहे आणि अपेक्षित परिणाम कोणते आहेत, याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन झाले पाहिजे. अशा मूल्यमापनाच्या आधारे तुलनात्मक पदांची निश्चिती केली तर वेतनातील तफावत न्याय्य आहे की नाही, हे अधिक पारदर्शकपणे ठरविता येईल.

कर्मचारी संघटनांची भूमिकाही या प्रक्रियेत महत्त्वाची आहे. वेतनातील असमानतेविरुद्ध आवाज उठविणे हा लोकशाही व्यवस्थेतील वैध मार्ग आहे. मात्र मागणी अधिक प्रभावी होण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप, पात्रता, जबाबदारी आणि वेतनातील तफावत यांची ठोस माहिती पुढे ठेवणे आवश्यक आहे. दुसरीकडे शासन आणि संस्थांनीही अशा मागण्यांकडे केवळ आर्थिक भार किंवा कर्मचारी आंदोलन म्हणून न पाहता त्यामागील न्यायाच्या प्रश्नाचे परीक्षण केले पाहिजे.



आजच्या बदलत्या रोजगारव्यवस्थेत 'समान काम, समान वेतन' या तत्त्वाची व्याप्ती आणखी वाढत आहे. कंत्राटीकरण, बाह्य मनुष्यबळ, मानधन व्यवस्था आणि विविध प्रकारच्या रोजगार करारांमुळे एकाच कार्यस्थळी वेगवेगळ्या सेवा-अटी असलेले कर्मचारी काम करतात. त्यामुळे भविष्यात 'कामाचे मूल्यमापन' ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरणार आहे. पदाचे नाव किंवा नियुक्तीची पद्धत यापेक्षा कर्मचारी प्रत्यक्षात काय काम करतो, किती जबाबदारी पार पाडतो आणि त्याच्याकडून कोणत्या कौशल्याची अपेक्षा केली जाते, यावर अधिक भर देण्याची गरज आहे.

शेवटी 'समान काम, समान वेतन' हा प्रश्न केवळ वेतनवाढीचा प्रश्न नाही. तो समानता विरुद्ध असमानता, न्याय विरुद्ध अन्याय आणि अधिकार विरुद्ध आर्थिक व्यवहार्यता यांच्यातील संतुलनाचा प्रश्न आहे. सर्व कर्मचाऱ्यांना कोणताही फरक न करता समान वेतन देणे ही समानतेची योग्य व्याख्या ठरणार नाही; त्याचप्रमाणे नियुक्तीचा प्रकार किंवा पदनाम वेगळे आहे म्हणून प्रत्यक्ष कामातील समानतेकडे दुर्लक्ष करणेही योग्य ठरणार नाही.

खरी गरज आहे ती पारदर्शक आणि वस्तुनिष्ठ व्यवस्थेची. समान कामाची स्पष्ट व्याख्या, कामाचे वैज्ञानिक मूल्यमापन, वेतनातील तफावतीची कारणमीमांसा आणि न्याय्य सेवा-अटी यांमुळे या प्रश्नाकडे अधिक संतुलितपणे पाहता येईल. 'समान काम, समान वेतन' हे घोषवाक्य कितीही आकर्षक असले तरी त्याची खरी परीक्षा प्रत्यक्ष अंमलबजावणीतच होते. म्हणून प्रत्येक वेतनतफावतीसमोर एक साधा प्रश्न उभा राहिला पाहिजे-या फरकाला स्पष्ट, वस्तुनिष्ठ आणि न्याय्य कारण आहे का? या प्रश्नाचे उत्तर पारदर्शकपणे देता आले, तर समानतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडेल.

**- डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## सुसाट वेगात चुकीच्या दिशेने वळण; पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाची भारतीय युद्धनौकेला धडक

(पान १ वरून...)

कराराचा सन्मान करायला हवा. त्यामुळे भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळली जाईल. भारतानं केवळ दिल्लीत विरोध दर्शवलेला नाही. इस्लामाबादमधील भारताचे चार्ज ऑफ द अफेअर्स यांनी पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे अशाच प्रकारचा निषेध नोंदवावा, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारतानं हा मुद्दा द्विपक्षीय स्तरावर उचलला आहे.

आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत दोन देशांच्या नौदलांच्या जहाजांची धडक ही घटना छोटी वाटू शकते. पण सैन्य शिस्त आणि कराराचं पालन यावर ही घटना प्रश्नचिन्ह उपस्थित करते. आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात घटना घडलेली असूनही भारतानं याकडे दुर्लक्ष केलेलं नाही. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी भारताचे प्रयत्न सुरू आहेत.

## सोलापूर जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्याफिती लावून कामकाज... सुधारित वेतन श्रेणीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी सोलापूर जिल्हा न्यायालयाच्या अधिपत्ता खाली शहर व तालुका न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी बुधवारी (१६ सप्टेंबर) काळ्याफिती लावून दैनंदिन कामकाज केले.

राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन श्रेणीच्या प्रस्तावावर शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतलेला नसल्याने चारही न्यायन कर्मचाऱ्यांनी महासंघाने आंदोलनाची घोषणा केली आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात कर्मचाऱ्यांची काळ्याफिती लावून कामकाज केले यानंतर पाच नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा ६ व ७ नोव्हेंबर रोजी अन्यथा का आंदोलन करण्यात येणार आहे मागणीच्या सहानभूतीपूर्वक विचार न झाल्यास १७ नोव्हेंबर पासून बेमुदत संपाचा इशारा देण्यात आला आहे

या आंदोलनात तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्याम राजे पांढरे, लहू लेखक संघटनेचे अध्यक्ष शकील शेख बोलीत संघटनेचे अध्यक्ष गणेश सोलंकर चतुर्थश्रेणी संघटनेचे अध्यक्ष सुकृत कुलकर्णी प्रबंधक संजय मकालवार यांच्यासह शहर व तालुका न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले होते.




## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - शेतकरी गट, उत्पादक कंपनी, कृषी क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था यांनी पिक प्रात्यक्षिक घटकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका):- राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया या अभियानाला मंजुरी दिली आहे. यात समूह आधारित कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर अभियानांतर्गत सोयाबीन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापुर जिल्हयाची निवड करण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रमातंर्गत रब्बी हंगम मध्ये करडई पिकाचे सुधारीत तंत्रज्ञानावर आधारीत समुह पिक प्रात्यक्षिके घटकाअंतर्गत अनुदानावर बियाणे व निविष्ठा ही बाब शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषी क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था इ. द्वारे राबविण्यात येणार आहे. याकरीता चरहरऊढ पोर्टलद्वारे नोंदणीकृत शेतकरी गट / कंपनी / संस्था यांची निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (ऋउऋड) या तत्वावर करण्यात येणार आहे.

निवड निकष -

शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषी क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था ३१ मार्च, २०२५ पूर्वी नोंदणी असणे आवश्यक आहे.

शेतकरी गट कोणत्याही शासन यंत्रणेकडे नोंदणीकृत असावा. (जसे कि, आत्मा, महाराष्ट्र ग्रामीण जीवोन्नोत्ती अभियान (चडठडच्), राष्ट्रीय ग्रामीण जीवोन्नोत्ती अभियान (छठडच्), महिला आर्थिक विकास महामंडळ, नाबार्ड इ.) पिक प्रात्यक्षिकाची अंमलबजावणी करताना शेतकरी गटांना अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गाच्या खातेदारांच्या उपलब्धतेनुसार सदर प्रवर्गाच्या शेतकरी व महिलांना विहित प्रमाणानुसार लाभ देणे बंधनकारक राहील. तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे. सदरील शेतकऱ्यांचा गटामध्ये समावेश नसल्यास नव्याने नोंदणी करून समावेश करावा. लाभ द्यावयाच्या एकूण लाभार्थ्यांपैकी ३० टक्के महिला लाभार्थी असावेत.

निवड झालेल्या शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपनी/ कृषी क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था यांनी योजना मार्गदर्शक सुचनेमध्ये दिलेप्रमाणे प्रपत्र-१ नुसार हमीपत्र द्यावे. आवश्यक प्राधान्यक्रमाप्रमाणे शेतकरी गटामध्ये उपलब्ध नसतील तर, गटाबाहेरील पात्र शेतकऱ्यांची निवड करता येईल, एका कुटुंबातील (पती, पत्नी व १८ वर्षा खालील अपत्य) एकाच व्यक्तीस लाभ देण्यात यावा. पीक प्रात्यक्षिकासाठी निवडलेल्या गटात २५ पेक्षा जास्त शेतकरी असल्यास संबंधित गटाने २५ शेतकऱ्यांची निवड करावयाची आहे. गटामध्ये जे शेतकरी शासनाने ठरवून दिलेल्या तंत्रज्ञानाप्रमाणे पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यास तयार असतील अशाच शेतकऱ्यांची निवड लाभार्थी म्हणून करावी. गटातील शेतकऱ्यांना पिक प्रात्यक्षिकाचा लाभ देताना सीऌीींरलज्ञ वर नोंदणी असणे बंधनकारक आहे,

### निफाड महाविद्यालयात 'जागतिक ओझोन दिन' साजरा

# ओझोन थर संवर्धन काळाची गरज : प्रा. डॉ. सी. बी. निगळे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : ओझोन थर ही पृथ्वीची नैसर्गिक संरक्षक छत्री असून ती सूर्यापासून येणाऱ्या घातक अतिनील (UV) किरणांना शोषून घेते. मात्र, वाढते औद्योगिकीकरण, रासायनिक शीतकरण उपकरणे, क्लोरोफ्लुरोकार्बन्स (CFCs) आणि इतर घातक वायूंमुळे या थराला हानी पोहोचत आहे. 'मॉन्ट्रियल प्रोटोकॉल'च्या यशस्वी अंमलबजावणीमुळे ओझोन थराची पुनर्निर्मिती शक्य होत आहे, परंतु वैयक्तिक पातळीवर प्लास्टिकचा त्याग, एसी-रेफ्रिजरेटरचा मर्यादित वापर आणि सार्वजनिक वाहतुकीचा स्वीकार यांसारख्या सवयी पाळल्या तरच हे संरक्षण टिकून राहील.

ओझोन थराच्या संवर्धनासाठी आणि पृथ्वीवरील सजीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी प्रत्येकाने पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारणे ही आजच्या काळाची नितांत गरज आहे, असे परखड प्रतिपादन डॉ. सी. बी. निगळे यांनी केले. निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने १६ सप्टेंबर रोजी आयोजित 'जागतिक ओझोन दिन' विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. व्ही. बी. काळे यांनी म्हटले, पर्यावरण संवर्धन ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती दैनंदिन जगण्याची पद्धत बनायला हवी. झाडे लावणे, ऊर्जेची बचत करणे आणि कार्बन फूटप्रिंट कमी करणे या दिशेने तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे. शाश्वत विकासासाठी निसर्गाचा आदर राखणे आणि हवामान बदलाच्या संकटाविरुद्ध सतर्क राहणे हे प्रत्येक सजग नागरिकाचे कर्तव्य आहे. आणि ही जबाबदारी सजग तरुणाई निश्चित यशस्वीपणे पार पाडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पृथ्वीपूजन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविकातून श्रीमती आर. एन. नाठे यांनी दिनविशेष आणि कार्यक्रमाचा मुख्य हेतू आणि उद्देश स्पष्ट केला.

सूत्रसंचालन श्रीमती पी. पी. धारराव यांनी केले केले तर, आभार प्रा. जी. एन. सानप यांनी मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये ओझोन थर रक्षण आणि पर्यावरण संतुलनाविषयी नवी दृष्टी व जनजागृती निर्माण झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निफाडला मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात मोकाट कुत्रे; युवासेनेचे आक्रमक आंदोलन

## विक्रम रंधवेंनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात टेबलावर सोडले ४ ते ५ कुत्रे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी युवासेनेचे जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे यांनी बुधवारी आक्रमक आंदोलन केले. थेट निफाड नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात टेबलावर ४ ते ५ मोकाट कुत्रे आणून सोडण्यात आले.

निफाड शहर व परिसरा मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना मोकाट कुत्र्यांचा त्रास होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. कुत्र्यांच्या हल्लयामुळे नागरिक जखमी होण्याच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी व निवेदने देऊनही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. कुत्र्यांची नसबंदी (इउ कार्यक्रम) तसेच श्वान पकडण्याची प्रभावी व्यवस्था करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

प्रशासनाला समस्येची तीव्रता प्रत्यक्ष दाखवून देण्यासाठीच हे आंदोलन करण्यात आल्याचे विक्रम रंधवे यांनी सांगितले. नगरपंचायतीने तातडीने उपाययोजना करून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अन्यथा पुन्हा अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. प्रशासनाकडून तातडीच्या कारवाईचे आश्वासन पूर्ण न झाल्यास नागरिकांच्या उपस्थितीत पुन्हा मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यालयात मोकाट कुत्रे सोडण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी नगरसेविका रुपाली रंधवे, सुनील पाठक, बिरजू पठाण, रतन गाजरे, सचिन खडताळे यांच्यासह नगरपंचायत कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. आंदोलनामुळे काही काळ नगरपंचायत परिसरात चर्चेचे वातावरण निर्माण झाले.

**निफाडमध्ये ४०० हून अधिक मोकाट कुत्र्यांचा प्रश्न**

निफाड नगरपंचायत क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या ४०० हून अधिक असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### महिन्याला शंभरहून अधिक श्वानदंशाच्या घटना

**निफाड येथील उपजिल्हा रुग्णालयात मोकाट कुत्र्यांनी चावा घेतलेले दररोज सुमारे ५ ते ६ रुग्ण उपचारासाठी येतात. महिन्याला शंभरहून अधिक श्वानदंशाच्या रुग्णांवर उपचार केले जात असल्याची माहिती डॉ. राजीव तांबाळे यांनी दिली. सध्या निफाड उपजिल्हा रुग्णालयात अँटी-रेबीज लस उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.**

**- डॉ. राजीव तांबाळे**
**उपजिल्हा रुग्णालय निफाड**

### ७३ कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण

**निफाड नगरपंचायतीच्या वतीने मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. आतापर्यंत ७३ कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण करण्यात आले असून, श्वान पकडणे व निर्जंतुकीकरणासाठी नगरपंचायतीने दोन वेळा निविदा प्रसिद्ध केल्या आहेत. मोकाट कुत्र्यांची समस्या सोडविण्यासाठी नगरपंचायत प्रशासन तत्पर असून नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे.**

**- मुख्याधिकारी धीरज भामरे**
**निफाड नगरपंचायत**

# अमोल पुटगे यांची भारतीय जनता पार्टी अनु जाती मोर्चा मंडल अध्यक्षपदी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट , प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा सोलापूर जिल्हा ग्रामीणच्या वतीने अक्कलकोट तालुका ग्रामीण पूर्व मंडल अध्यक्षपदी अमोल पुटगे यांची निवड करण्यात आली आहे.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि भाजपचे राज्याचे अध्यक्ष विश्वजीत दादा गायकवाड, सोलापूर भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण, तसेच एसी मोर्चा जिल्हाध्यक्ष बालाजी वाघमारे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

या निवडीचे अधिकृत नियुक्तीपत्र भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बालाजी श्रीकांत वाघमारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

आपल्या संघटन कौशल्य, प्रामाणिकपणा व कार्यक्षमतेच्या बळावर पक्ष संघटन अधिक मजबूत कराल आणि अनुसूचित जाती मोर्चाचे कार्य ताळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचवाल, असा विश्वास व्यक्त करत उपस्थितांनी अमोल पुतगे यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉल्बीला फाटा देत सलग पाच दिवस महाप्रसादाचा संकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी ता. शिरोळ/प्रतिनिधी : गणेशोत्सव म्हटले की डॉल्बीचा दणदणाट आणि मोठ्या आवाजातील संगीत असे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळते. मात्र, या प्रथेला फाटा देत न्यू गोल्डन गणेशोत्सव मंडळ, दत्तवाड (ता. शिरोळ) यांनी यंदा सामाजिक बांधिलकी जपत सलग पाच दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्याचा संकल्प केला आहे. मंडळाच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.




सन १९७३ मध्ये स्थापन झालेल्या न्यू गोल्डन गणेशोत्सव मंडळाने गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले आहेत. यंदाच्या गणेशोत्सवात डॉल्बीच्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन त्याच निधीचा उपयोग भाविक व ग्रामस्थांसाठी महाप्रसादाच्या आयोजनासाठी करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

सलग पाच दिवस भाविकांसाठी महाप्रसाद उपलब्ध करून देण्यात येणार असून, गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या महाआरतीचे मानकरी उद्योजक संजय पाटील तसेच माजी महात्मा गांधी तंटामुक्त समिती अध्यक्ष सीए सुरेश पाटील राहणार आहेत.

ध्वनिप्रदूषणाला आळा घालत धार्मिक उत्सवाला सामाजिक उपक्रमाची जोड देणारा हा उपक्रम परिसरात आदर्श ठरत आहे. समाजोपयोगी संदेश देण्याचा मंडळाचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

**न्यू गोल्डन गणेशोत्सव मंडळाचा अनोखा उपक्रम**

# रांजणीत नवयुवक गणेश मंडळाच्या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील रांजणी येथे ४९ वर्षांची परंपरा असलेल्या नवयुवक गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास आजपासून प्रारंभ झाला आहे. 'एक गाव एक गणपती' ही अनोखी परंपरा रांजणी गावाने आजही जपली आहे.

या सप्ताहाच्या कलश पूजन, वीणा पूजन, गाथा पूजन आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे उद्घाटन कळंब-धाराशिवचे लोकप्रिय आमदार कैलास दादा पाटील आणि नॅचरल उद्योग समूहाचे अध्यक्ष कृषी रत्न बी. बी. ठोंबरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

हा अखंड हरिनाम सप्ताह पुढील सात दिवस भक्तिमय वातावरणात सुरू राहणार असून, या काळात नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य गणेश पवार, सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, अनिल काका ठोंबरे, प्रदीप ठोंबरे, सोसायटी चेअरमन प्रल्हाद गोरे, नासेर पठाण, फेरोज पठाण, वशिष्ठ कुचेकर, महारुद्र ढवणे, मंडळाचे अध्यक्ष राहुल सौदागर, उपाध्यक्ष कृष्णा गोरे



यांच्यासह संभाजी महाराज, आदित्य महाराज, किशोर महाराज, उद्धव गोरे, नवनाथ ढवणे, किसन आगरकर, प्रदीप आगरकर, शंकर इटकर, मल्हारी पांनढळे, महादेव राऊत, कल्याण भालेकर, हनुमंत चौधरी, नाना गायकवाड, सुरेंद्र बनसोडे, भजनी मंडळाचे सदस्य, नवयुवक गणेश मंडळाचे कार्यकर्ते व हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# करमाळा इंग्लिश स्कूल संघटनेच्या नूतन तालुका अध्यक्षपदी जयवंत दळवी यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र इंग्लिश मीडियम ट्रस्टीज असोसिएशन एफ च्या तालुकाध्यक्षपदी देवेंद्र दळवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे नियुक्तीपत्र आज प्रदेशाध्यक्ष जिल्हाध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले आहे.

प्रदेशाध्यक्ष हरी शिंदे, प्रदेश सचिव गणेश निळ, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संतोष वलगे प्रदेश सदस्य नितीन भोंगे जिल्हाध्यक्ष संभाजी घाडगे, जिल्हा सचिव शरद आनंद कब्बळस, जिल्हा खजिनदार डॉक्टर अमोल दुरंदे, आधी जण उपस्थित होते यावेळी करमाळा तालुका इंग्लिश संघटनेचे मार्गदर्शक कन्हैया देवी जेष्ठ प्रदेशाध्यक्ष जे प्रकाश बिले आषाढी मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत इतरही नेमणूक करण्यात आले आहेत करमाळा तालुका उपाध्यक्षपदी



राजकुमार राऊत, सचिव डॉ ब्रिजेश बारकुंड यांचीही नेमणूक करण्यात आली आहे यावेळी वरील सर्व नेमणुका महाराष्ट्र इंग्लिश मीडियम ट्रस्टीज असोशियन एफ च्या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत सर्वानुमती करण्यात आले आहे.

करमाळा तालुका इंग्लिश स्कूल संघटनेच्या अनेक समस्या आहेत मंत्रालय पातळीवरून सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल सध्या शिक्षक मतदार संघ तसेच पदवीधर मतदार संघासाठी विविध स्तरावरील उमेदवार फिरत आहे आमच्या दहा मागणी आहेत या संदर्भात आम्ही संबंधित इच्छुक उमेदवारांना निवेदन दिले आहेत त्या मागण्या मंजूर केल्या तर येणाऱ्या निवडणुकीत त्यांना योग्य ते सहकार्य संघटनेच्या तर्फे केली जाईल श्री जयवंत दळवी नूतन अध्यक्ष मेष्टा एफ इंग्लिश स्कूल संघटना तालुका करमाळा.

**दि १९, २०, २६, २७ सप्टेंबर रोजी सर्व मतदान केंद्रांवर आयोजन**

# मतदार यादीच्या पुनरीक्षणासाठी विशेष शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या अनुषंगाने पंढरपूर विधानसभा मतदार संघातील सर्व पात्र नागरिकांची, विशेषतः नवमतदार, महिला व दिव्यांग नागरिकांची शंभर टक्के नोंदणी पूर्ण व्हावी, यासाठी प्रशासनामार्फत मतदार संघात विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.



या मोहिमेअंतर्गत पंढरपूर विधानसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्रांवर १९,२०,२६ आणि २७ सप्टेंबर या चार दिवसांच्या कालावधीत १० ते ६ पर्यंत विशेष नोंदणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. या शिबिरांच्या वेळी सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी आपापल्या केंद्रांवर वेळेत उपस्थित राहून नागरिकांकडून मतदार नोंदणी, माहितीतील दुरुस्ती तसेच नावे वगळण्याचे अर्ज भरून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नव्याने मतदार नोंदणी करण्यासाठी दि. ०१ ऑक्टोंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांसाठी नमुना क्र. ६ हा अर्ज करता येईल. मतदार यादीतील चुकीची अथवा मयत,स्थलांतरीत मतदारांची नोंद वगळण्यासाठी नमुना क्र. ७ हा अर्ज करता येईल. तसेच मतदार यादीमधील चुकीच्या नोंदी जसे नाव, वय, लिंग, नातेसंबंध, पत्ता बदल याकरीता नमुना क्र. ८ हा अर्ज करता येईल.

लोकशाही बळकट करणेसाठी प्रत्येक पात्र नागरिकाने नाव नोंदणी करावी. तसेच पात्र मतदार हे यादीत नाव नोंदविण्यापासून वंचित राहणार नाहीत यासाठी पंढरपूर विधानसभा संघातील मतदारांनी सदरच्या विशेष शिबीरामध्ये सहभाग नोंदवून आपले मतदार यादीमधील नोंदी अद्यावत करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांनी केले आहे.

# मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक, क्लार्क ते मुख्य कार्यकारी अधिकारी, अतुल महमाने यांची यशस्वी वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आपल्या कार्यकर्त्यापेशी सदैव तत्पर आणि प्रामाणिकपणे वाहून घेणे हे ज्या व्यक्तीला जमले ही व्यक्ती कधीही आयुष्यामध्ये यशस्वी होत नाही क्लार्क व पदापासून ते मुख्य कार्यकारी अधिकारी या पदापर्यंत यशस्वीपणे वाटचाल करीत राहिलेले व्यक्तिमत्व म्हणजे दिन मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक पंढरपूर



बँकेचे सर व्यवस्थापक अतुल महमाने यांची नुकतीच रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी दि पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अतुल महमाने यांची नियुक्ती मान्यता देण्यात आली आहे.

१९९६ स.न. पंढरपूर मर्चंट कॉपरेटिव बँक एक बँकेमध्ये क्लार्क या पदावर आपल्यास कार्य आरंभ सुरू केला आणि बघता बघता अतुल महमाने मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर आपली यशस्वी वाटचाल करीत आहेत. त्यांच्या या बँकिंग सेवा क्षेत्रातील कार्याचा लाभ पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक या संस्थेला व तेथील कर्मचाऱ्यांना होणार आहे.

मी पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजेंद्र पवनलाल पडे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी या सत्कार समारंभात त व्हॉइस चेअरमन आदित्य फत्तेपुरकर, नागेश काका भोसले सोमनाथू डोंबिवली सुधीर भोसले अमरजीत पाटील विजयकुमार परदेशी आणि व्यवस्थापन रमेश कुलकर्णी व अन्य कर्मचारी वर्ग उपस्थित होतात.

मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदोन्नती लाभलेले अतुल महामाने यांच्या सर्व सरातून अभिनंदन चा वर्षाव होत आहे.

# अभियंत्यांची गुणवत्ता समाजाच्या विकासाला गती देते : आयकर विभागाचे निरीक्षक राजानंद लोणकर

## स्वेरीमध्ये 'अभियंता दिन' साजरा







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'अभियंत्यांची गुणवत्ता ही सुईच्या निर्मितीपासून ते अवकाशातील मिसाईलपर्यंतच्या प्रत्येक उपक्रमात दिसून येत असते. यामध्ये अभियंते एकाग्र होवून आपले सर्वस्व पणाला लावतात. यासाठी अभियांत्रिकी क्षेतातील प्रत्येक विभाग महत्वाचा असतो. यातून कोणतेही एक क्षेत्र निवडायचे आणि त्यात करिअर करायचे हे जर सूत्र ठेवले तर त्या विभागातील अधिकाधिक ज्ञान मिळायला मदत होते. म्हणून पदवीनंतर अभियंत्यांनी आपल्या क्षेत्रातील नवनवीन ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करावा तसेच सिव्हील सर्विस सेक्टर मध्येही करिअर करावे. यासाठी पदवीनंतर सुरवातीचे एक दोन वर्षे कंपनीतील कामांचा अनुभव घ्यावा. त्यातून कामाची आवड निर्माण होते, कामात एकाग्रता निर्माण होते आणि विद्यार्थी अपडेट राहतो. एकूणच अभियंत्यांची गुणवत्ता ही समाजाच्या विकासाला योग्य दिशा आणि गती देत असते.' असे प्रतिपादन आयकर विभागाचे निरीक्षक राजानंद लोणकर यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या खुल्या रंगमंचावर भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १६५ व्या जयंती निमित्त 'अभियंता दिन' साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर विभागाच्या आयकर विभागाचे निरीक्षक राजानंद अर्जुन लोणकर हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवशाही कॉलेज, शाहुवाडीचे डॉ.प्रकाश वाघमारे हे होते. सर विश्वेश्वरय्या यांची प्रतिमा पूजन, महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविकात म्हणाले की, 'भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची सिव्हील विभागातील अतुलनीय कामगिरी पाहता यशस्वी अभियंत्यांची व्याख्या समजते. जन्म घेणे हे आपल्या हातात नसते परंतु मिळालेल्या जन्माला सार्थक कसे बनवायचे हे आपल्या हातात असते म्हणून जीवनाचे महत्व वाढवायचे असल्यास आपल्याला नेहमीच्या जीवनशैलीत बदल करणे गरजेचे आहे. यासाठी अभियंत्यांनी प्रत्येक क्षेत्रात योगदान देण्याची तयारी ठेवावी. एकूणच आपण ध्येय ठरविल्यावर 'कन्फर्ट झोन'च्या बाहेर जावून कार्य केल्यास यशाचा आनंद घेता येईल.' असे सांगून उच्च शिक्षण घेताना आलेल्या अडचणी व त्यावर केलेली मात याबाबत सांगितले. 'अभियंता दिना'चे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात गोल्ड मेडल मिळविलेल्या डॉ. तुषार वाघमारे यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला तसेच दौलतराव विद्यालय, कासेगावचे प्रा. प्रकाश ठोंबरे व न्यू इंग्लिश स्कूल वेळापूरच्या सौ.शीतल काळे यांना 'ज्ञानयात्री आदर्श शिक्षक' पुरस्कार देण्यात आले. यावेळी डॉ.सत्यवान माळी म्हणाले की, 'अल्पावधीत उच्च स्थानी पोहचलेल्या स्वेरीचे विद्यार्थी यशस्वी का होतात? याचे उत्तर उलगडले कारण 'हार्ड वर्क' करणे हे येथील विद्यार्थ्यांच्या नसानसात भिनले आहे. अल्पावधीत स्वेरीची यशस्वी झेप, होत असलेले मार्गदर्शन यावरून यशाची व्याख्या समजते. अध्यक्ष स्थानावरून बोलताना डॉ.प्रकाश वाघमारे म्हणाले की, 'ज्याप्रमाणे खर्डीच्या आप्पा सरांनी डॉ.रोंगे सरांना घडविले त्याप्रमाणे मला देखील अमोल मोरे सरांनी घडविले. दोघांत सेम संघर्ष आहे. बालपणी आप्पा सरांनी दिलेल्या स्फूर्तीमुळे डॉ.रोंगे सरांच्या जीवनाला कलाटणी मिळाली त्यामुळे स्वेरीतील अनेक जण देश परदेशात यशस्वी करिअर करत आहेत तर स्वेरीतील अनेक विद्यार्थी परिश्रम घेवून करिअर उज्वल करत आहेत. 'हार्ड वर्क करणे' हे विद्यार्थी दशेत अंगवळणी लागले आहे.' असे सांगून स्वेरीच्या संशोधन विभागाचे कौतुक केले. यावेळी स्वेरीतील अभियंत्यांचे सन्मान केले गेले. यामध्ये उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मानही करण्यात आला. यावेळी तुकाराम वाघमारे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, सचिव डॉ.सुरज रोंगे, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. सतिश मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. तृप्ती चलवाड, सेजल ठाकूर व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एन. ए. तळवलकर यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थिनी सचिवा नेहा झिरपे यांनी आभार मानले.

## नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य, विकास कामांना गती : नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरामध्ये वार्ड क्रमांक दोन मधील पिण्याचा पाण्याचा प्रश्न संबंधित चर्चा करून संबंधित नागरिकांच्या अडचणी व प्रश्न जाणून घेतल्या,

पंढरपूर नगरपालिका वार्ड क्रमांक दोन प्रभागातील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात आला असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि त्यांच्या दैनंदिन समस्या यांना नगराध्यक्ष म्हणून नेहमीच प्राधान्य देत, प्रश्नांची प्रभावीपणे सोडवणूक करण्यासाठी कटिबद्ध आहे.

यावेळी प्रभाग क्रमांक दोन चे नगरसेवक प्रसाद भैया कळसे उपस्थित होते.

पंढरपूरच्या सर्वांगीण विकासात बाबतीत प्रत्येक प्रभागातील नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देणे, हीच जबाबदारी आणि बांधिलकी आहे.

## सोलापूर ग्रामीण हद्दीतील सराईत गुन्हेगार महादेव मारुती इरकल एमपीडीए कायद्यान्वये येरवडा कारागृहात स्थानबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मा. रंजन कुमार शर्मा सो., विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर, परिक्षेत्र कोल्हापूर मा. अतुल कुलकर्णी, पोलीस निरीक्षक सोलापूर ग्रामीण, हद्दीतील शरीराविषयी वाळू तस्करी अवैद्य धंदे करणारा स्वराज गुन्हेगारावर प्रभावी कारवाई करून गुन्हे दाखल करावे तसेच प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत फक्त आदेश दिले होते. मंगळवेढा पोलीस ठाणे हद्दीतील शर्यत गुन्हेगार नामें नामदेव मारती इरकर राहणार भाळवणी तालुका मंगळवेढा सध्या राहणार शांतीनगर मंगळवेढा तालुका मंगळवेढा, जिल्हा सोलापूर यांच्या वाढत्या गुन्हेगारी वृत्तीवर आळा घालण्यासाठी मा अतुल कुलकर्णी सो यांच्या मार्फतीने माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरेगिडे मंगळवेढा पोलीस ठाणे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे एम पी डी ए कायद्यान्वये प्रस्ताव सादर करण्यात करण्यात आला होता.

मा. मा श्री कीर्तीकियन जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी सोलापूर यांनी एम पी डी ए कायद्यान्वये नमूद माधव मारुती इरकर यांना स्थानबद्ध करण्याबाबत आदेश निगमित केली होते. तेव्हापासून तू फरार झाला होता. तो पिलीव माळशिरस तालुक्यात तसेच नागोबा परिसर तालुका मान जिल्हा सातारा

या ठिकाणी येणार असल्याची गोपनीय माहिती पोलीस पथकास मिळाल्याने पोलीस निरीक्षक बोरगीडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पोसाई पिसे यांनी सदर ठिकाणी जाऊन मोठ्या शतापीने नमूद महादेव मारुती इरकर याच दिनांक १५/ ९/ २६ रोजी तब्येत घेऊन पुढील कारवाई करिता मंगळवेढा पोलीस ठाण्यात आणले नमूद मारुती महादेव इरकर यांच्यावर कारवाई करून एडवडा कारागृहात पुणे येथे १६ /९/ २०२६ रोजी स्थानबद्ध केले आहे.

सोलापूर ग्रामीण हद्दीतील वाळू तस्करी व शरीरातील मला विषयी मी अवैध दारू विक्री करणारे अन्य सराईत गुन्हेगाराचा अभिलेख तयार करून त्यांच्याविषयी एम पी डी ए कायद्यान्वये यापुढे देखील अशाच प्रकारची कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मा श्री अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी दिला आहे.

सदरची कारवाई मा श्री रंजन कुमार शर्मा, सो विशेष महा पोलीस निरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर, मा श्री अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, मा श्री विजय कबाडेसो. अप्पर पोलीस अधीक्षक, मा पेरणा कट्टेसो. अप्पर पोलीस अधीक्षक, मा श्री बसवराज शिवपुजे उपविभागीय पोलीस अधिकारी मंगळवेढा उपविभाग, मा श्री अभिजीत पाटील अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली संजय जगताप स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण, मंगळवेढा वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरी गीते वसई विजय पिसे वसई बनकर, पो.हे.को./६०२/ नितीन पलूसकर, मपोको.१५२९/ अजय शिंदे. अण्णासाहेब पवार, सिद्धनाथ शिंदे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, शेख, मोहन मंसावले नीलकंठ जाधव, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील उत्कर्ष देवकुळे नायब तहसीलदार मंगळवेढा यांनी केले आहे.

## चांदवड पोलिसांच्या तपासाला यश, चोरीची मोटरसायकल चोरट्याकडून हस्तगत





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : चांदवड तालुक्यातील तळेगाव रोही येथून चोरीस गेलेल्या मोटरसायकलचा छडा लावण्यात चांदवड पोलिसांना यश आले आहे तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी मोटरसायकल चोरी करणाऱ्या संशयीताचा शोध घेत त्याला जेरबंद केले असून केदु शरद केदारे राहणार तळेगाव रोही तालुका चांदवड या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, त्याचेकडून चोरीस गेलेली मोटरसायकल पोलिसांनी जप्त केले आहे.

याप्रकरणी पंकज गोरखनाथ भोकनळ राहणार तळेगाव रोही यांच्या फिर्यादीवरून चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डीएस स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक मालेगाव सुरज गुंजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित तसेच पोलीस निरीक्षक अभिजीत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून पोलीस हवालदार राजू गायकवाड, पोलीस अंमलदार योगेश हटकर, विश्वनाथ शेळके, प्रदीप आजागे, विक्रम बसाते भूषण साळवे यांच्या पथकाने ही कारवाई केली पुढील तपास पोलीस करत आहे.

**जिवंत देखाव्याची परंपरा यंदाही कायम**

**डीजे मुक्त मिरवणूक; पर्यावरणपूरक विसर्जनाचा निर्णय**

# कळंबचा राजा यंदाही वेगळ्या संकल्पनेत; अवघी ४ फुटांची मूर्ती ठरणार आकर्षण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कळंब शहरातील विविध गणेश मंडळांकडून मोठ्या मूर्ती व भव्य सजावटीची जय्यत तयारी सुरू असताना, शहरातील सर्वात जुन्या आणि जिवंत देखाव्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या श्री शिवशंकर गणेश मंडळाच्या (कळंबचा राजा) यंदाच्या वेगळ्या संकल्पनेची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

शहरात मोठमोठ्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होत असताना 'कळंबचा राजा'ने मात्र यंदाही केवळ ४ फुटांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा निर्णय घेतला आहे. आकारापेक्षा भक्ती, परंपरा आणि सामाजिक संदेशाला महत्त्व देण्याची मंडळाची भूमिका यामागे आहे.

यंदा मंडळाने मानवी रूपातील अतिशय सुंदर आणि आकर्षक गणेशमूर्ती आणली असून, गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेन येथून सुमारे ८०० किलोमीटरचा ये-जा प्रवास करून ही मूर्ती कळंबमध्ये आणण्यात आली आहे. सुंदर दागिन्यांनी सजलेली ही मूर्ती भाविकांचे मन निश्चितच आकर्षित करणार आहे.

मंडपाच्या सजावटीची जबाबदारी झ ऊॠलीरींळेपी (आदित्य पवार) यांनी सांभाळली असून, त्यांनी आकर्षक व देखणा शामियाना उभारला आहे. मंडपाच्या सजावटीला या माध्यमातून चार चाँद लागले आहेत.

'कळंबचा राजा'च्या दरबारातील आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी लावण्यात येणारी १० ते १५ मोठ्या नारळांची तोरणे. वर्षानुवर्षे ही परंपरा कायम असून, या तोरणांमागे भाविकांची श्रद्धा आणि मंडळाला आलेले अनुभव यांची एक वेगळीच परंपरा जोडलेली आहे.

मंडळाचे अध्यक्ष प्रसन्न हुलसूरकर, उपाध्यक्ष मयूर लोखंडे, खजिनदार पवन वेदपाठक, सचिव वेदांत हुलसूरकर, कार्याध्यक्ष अतुल पाटील, प्रमुख संयोजक धीरज (लाला )मालपाणी आणि संयोजक प्रसाद हुलसूरकर, संगमेश मेनकुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाच्या गणेशोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे.

**जिवंत देखाव्याची परंपरा यंदाही कायम**

दरवर्षी जिवंत देखाव्याच्या माध्यमातून सामाजिक विषय मांडण्याची परंपरा मंडळाने यंदाही कायम ठेवली आहे. विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय आणि शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचार या गंभीर विषयावर सामाजिक संदेश देणारा जिवंत देखावा यंदा सादर करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

या देखाव्याबाबत कळंब शहरातील नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून, दरवर्षी आपल्या वेगळ्या संकल्पना आणि देखाव्यामुळे लक्ष वेधून घेणाऱ्या 'कळंबचा राजा'चे यंदाचे नियोजन नेमके कसे असेल, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

**डीजे मुक्त मिरवणूक; पर्यावरणपूरक विसर्जनाचा निर्णय**

मंडळाने यंदा ॠा मुक्त गणेश विसर्जन मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पाण्याची वाढती टंचाई लक्षात घेऊन गणेशमूर्तींचे पारंपरिक पद्धतीने विसर्जन न करता मूर्तीचे जतन करण्याचा पर्यावरणपूरक निर्णय मंडळाने घेतला आहे.

वारकरी व पारंपरिक संस्कृतीला साजेशी मिरवणूक काढून गणेशमूर्तीचे जतन करण्यात येणार आहे. भक्ती, परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम यंदाच्या गणेशोत्सवात पाहायला मिळणार आहे.

दरवर्षी आपल्या वेगळ्या संकल्पना, आकर्षक सजावट आणि सामाजिक संदेशातून कळंब शहरात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'कळंबचा राजा'कडून यंदाही काहीतरी आगळेवेगळे पाहायला मिळेल, अशी अपेक्षा कळंब शहरातील नागरिक व्यक्त करत आहेत.